# माने  महाविद्यालयात वृक्षारोपण!!




**फोटो: वृक्षारोपण करताना संस्थाध्यक्ष श्री.रवींद्रजी माने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेश भागवत शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी**

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार दि. १ जुलै रोजी महाराष्ट्र राज्यात २ कोटी वृक्ष लागवडीचा उपक्रम  हाती घेण्यात आला. त्या अनुषंगाने प्रबोधन शिक्षण प्रसारक संस्थेच्या राजेंद्र माने अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि नेचर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या या कार्यक्रमामध्ये संस्थाध्यक्ष श्री.रवींद्रजी माने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेश भागवत,विविध

विभागप्रमुख,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सर्वप्रथम संस्थाध्यक्ष व प्राचार्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

त्यानंतर महाविद्यालयाच्या प्रांगणात विविध प्रकारच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. याप्रसंगी अनौपचारिक संभाषणात संस्थाध्यक्ष श्री.रवींद्र माने यांनी वृक्ष ही काळाची गरज असून वृक्षसंवर्धनाचे महत्त्व विषद केले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा.राहुल बेळेकर व नेचर क्लबचे प्रा. मंगेश प्रभावळकर यांनी नियोजन केले.यशस्वितेसाठी प्रा. राहुल पोवार, प्रा.गुरुप्रसाद बुर्शे,प्रा.गणेश वाफेळकर,उमेश शिर्के,विवेक चाळके यांनी परिश्रम घेतले.